


दैनिक
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

# अक्षराज

मुख्य संपादक : विनोद कैलास गोरे    Email : newsaksharaj2021@gmail.com




● वर्ष ०३ रे ● अंक २७५ वा ● पाने ०४ ● किंमत : ३ रुपये | ठाणे, शनिवार, दि.२५ जुलै २०२६ | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023
● YEAR : 03 ● ISSUE : 275 ● PAGES : 04 ● PRICE RS. : 03 | THANE, Saturday, 25 July 2026 | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023

## शिक्षण मंत्रालयाची मोठी कारवाई; पण धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा नाहीच

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२४, नवी दिल्ली :**



नीट पेपर फुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारुन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. यासाठी कॉकरोच जनता पार्टीचं गेल्या महिन्याभरापासून आंदोलन सुरू आहे. काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनीदेखील प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरलेली आहे. पण सरकारनं अद्याप तरी प्रधान यांचा राजीनामा घेतलेला नाही. त्याऐवजी एनटीएच्या अधिकाऱ्यांवर कारवाया सुरू केलेल्या आहेत.

शिक्षण प्रक्रिया आणि परीक्षा यांच्यात मोठ्या सुधारणा घडवण्यासाठी नॅशनल टेस्टिंग एजन्सीनं मोठं पाऊल उचललं आहे. शिक्षण मंत्रालयातील सुत्रांच्या माहितीनुसार, NTA नं ४७ अधिकाऱ्यांना निलंबित केलं आहे. यासोबतच काही अधिकाऱ्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाईदेखील केली जाणार आहे.

सुत्रांच्या माहितीनुसार, ही कारवाई NTA मधील मोठ्या सुधारणा आणि उत्तरादायित्व निश्चित करण्यासाठीच्या एका मोठ्या अभियानाचा भाग आहे. येणाऱ्या कालावधीत यंत्रणेत आणखी महत्त्वाच्या सुधारणा करण्यात येतील, अशी माहिती शिक्षण मंत्रालयाकडून देण्यात आली आहे. पेपर लीकच्या घटना आणि त्यामुळे रद्द झालेल्या परीक्षा यामुळे NTA सातत्यानं वादात राहिली आहे. यामुळे शिक्षण मंत्रालयच अडचणीत आलं आहे. पण सरकार शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्याच्या मनस्थितीत नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांची गच्छंती होत असताना प्रधान यांना अभय देण्यात आल्याची चर्चा आहे.

NTA मध्ये रचनात्मक बदल होण्याची दाट शक्यता आहे. यंत्रणेच्या कार्यप्रणालीत व्यापक बदल केले जाणार आहेत. शिक्षण मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, ही कारवाई संस्थेच्या पुनर्रचनेच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल आहे. परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, विश्वासार्ह करण्याच्या हेतूनं ही कारवाई करण्यात आली आहे.

दुसरीकडे कॉकरोच जनता पार्टी केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यावर ठाम आहे. आज दुपारी सीजेपीचे प्रतिनिधी केंद्रीय मंत्री जेपी नड्डा, जितेंद्र सिंह यांना भेटले. तेव्हा त्यांनी तीन मागण्या सरकारसमोर ठेवल्या. यातील दोन मागण्यांवर सकारात्मक आहे. तिसरी मागणी प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी होती. याबद्दल सरकार फारसं अनुकूल नसल्याचं समजतं.

## साताऱ्यात ६ मित्रांचा प्लॅन जीवघेणा ठरला, घाटात जाणं चुकलंच, तिघांचा करुण अंत

**अक्षराज : वृत्तसंकलन**




**दि.२४, सातारा :** हॉटेलमध्ये जेवण केल्यानंतर मध्यरात्री घाटात फिरायला जाणे ३ मित्रांच्या जीवावर बेतले आहे. फलटण तालुक्यातील वाठार निंबाळकर येथे भरधाव स्वीफ्ट कार पुलाच्या कठड्याला धडकून पलटी झाल्याने तीन जण ठार तर अन्य तिघे गंभीर जखमी झाले. गुरुवारी मध्यरात्री हा भीषण अपघात झाला. मृत आणि जखमी हे कमिन्स कंपनीचे कर्मचारी आहेत. चालकाचे भरधाव कारवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याचे जखमीच्या जबाबातून स्पष्ट झाले आहे. या अपघातात कारचालक मोहम्मद हुसेन (मूळ रा. अयोध्या, उत्तर प्रदेश), अनिल हेबरम आणि सदानंद पुर्ती (दोघे रा. जमशेदपूर, झारखंड) या तिघांचा जागीच मृत्यू झाला. तर नयन अमरजित लोंगाणी (वय २८, मूळ रा. अहिल्यानगर), सौरभ कुमार (रा. झारखंड) आणि एम. डी. सितारे (रा. बिहार) हे तिघे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर फलटण आणि बारामतीतील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**नेमकं काय घडलं?**

फलटण ग्रामीण पोलीस आणि घटनास्थळारून मिळालेल्या माहितीनुसार, सुरवडी (ता. फलटण) येथील कमिन्स कंपनीत काम करणाऱ्या सहा मित्रांनी गुरूवारी रात्री हॉटेलला जेवायला जायचा बेत आखला होता. त्यानुसार सायंकाळी काम आटोपून सहा मित्र स्वीफ्ट कारमधून (MH-16-ET-1756) बडेखान येथील सह्याद्री हॉटेलमध्ये जेवायला गेले होते. जेवण झाल्यानंतर परत येत असताना काही जणांनी ताथवडे घाटात फिरून येण्याचा हट्ट केला. त्यामुळे कार ताथवडे घाटाकडे नेण्यात आली.

घाटात बराच वेळ घालवला, परतताना भरधाव कारची कठड्याला धडक

ताथवडे घाटात बराच वेळ घालवून मध्यरात्री ते पुसेगाव-फलटण मार्गे वाठार निंबाळकरकडे परत येत होते. मोहम्मद हुसेन हा कार चालवत होता. अति वेगामुळे त्याचे कारवरील नियंत्रण सुटले आणि कारने रस्त्यावरील छोट्या पुलाच्या कठड्याला जोरदार धडक दिली. कठड्याला धडकल्यानंतर कार पलटी झाली. ही धडक इतकी भीषण होती की चालक कारबाहेर फेकला गेला. तसेच कारचा चक्काचूर झाला.

**घटनेनंतर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल**

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि फलटण ग्रामीण पोलिसांनी धाव घेतली. कारमध्ये अडकलेल्या तरुणांना बाहेर काढून रुग्णवाहिकेतून उपचारासाठी रूग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान तिघांचा मृत्यू झाला.

फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद झाली असून पोलीस अधिक तपास करत आहेत. दरम्यान, या अपघाताच्या घटनेनर जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## मुंबई-पुणे रेल्वेमार्गासाठी नवा प्रकल्प, कर्जत ते लोणावळादरम्यान आपत्कालीन रस्ता उभारणार



**दि.२४, मुंबई :** रेल्वे घाटमार्गात अतिवृष्टी, दरड कोसळणे आणि आपत्कालीन स्थितीत खोळंबलेल्या प्रवाशांच्या सुरक्षेसाठी मध्य रेल्वेने अखेर पावले टाकली आहेत. कर्जत ते लोणावळादरम्यान २६ किलोमीटर लांबीचा आपत्कालीन रस्ता तयार करण्याचे नियोजन रेल्वे प्रशासनाने सुरू केले आहे. घाटात रेल्वेमार्ग बंद झाल्यावर, तात्काळ मदत पोहोचण्यासाठी हा रस्ता महत्त्वाचा ठरणार आहे.

**तिसऱ्या मार्गिकेचं काम अपूर्ण**

मुंबई-पुणे रेल्वेमार्गातील कर्जत ते लोणावळा घाट मार्गात ६ जुलै रोजी अतिवृष्टीमुळे भूस्खलन झाले. त्यामुळे घाटातील तीन मार्गिका पूर्णपणे बाधित झाल्याने रेल्वे वाहतूक थांबली होती. सध्या दोन मार्गिका पूर्ववत करून वाहतूक सुरू करण्यात आली आहे. मात्र तिसऱ्या मार्गिकेचे काम अद्याप अपूर्ण असल्याने त्यावरील रेल्वे वाहतूक बंदच आहे. दरम्यान, घाटात पोहोचण्यासाठी केवळ रेल्वेमार्गच असल्याने पर्यायी मार्गासाठी रस्ता उभारण्यात येणार आहे.

आपत्कालीन स्थितीत वापरण्यासाठी कर्जत ते लोणावळा दरम्यान रेल्वे मार्गालगत रस्ता उभारण्यात येणार आहे. २६ किलोमीटर लांब आणि एका वेळी दोन वाहने ये-जा करू शकतील, एवढी रस्त्यांची रुंदी असणार आहे. सद्यस्थितीत रस्त्यांची आखणी करण्याचे काम सुरू आहे. त्यानंतर मंजुरी प्रक्रिया पूर्ण झाल्यावर रस्ता तयार करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. या रस्त्यामुळे बस आणि आपत्कालीन वाहनांनी अडकलेल्या रेल्वेगाड्यांपर्यंत पोहोचणे शक्य होईल. अडकलेल्या प्रवाशांना तातडीने सुरक्षित स्थळी नेणेही शक्य होईल. आपत्कालीन रस्त्यामुळे रुग्णवाहिकांसह वैद्यकीय सुविधा पोहोचवणे शक्य होणार आहे. घाटातील तिसरी मार्गिका रेल्वे वाहतुकीसाठी खुली करण्याकरिता दुरुस्तीचे काम वेगाने सुरू आहे. दुरुस्ती आणि मजबुतीकरण केल्यानंतर आता सुमारे ५० ते ६० डंपरमधून ग्रॅन्युलर मटेरियलच्या मदतीने पाया भरण्यात येत आहे. भूस्खलन आणि अतिवृष्टीमुळे रुळांना आधार देणाऱ्या जमिनीचा भाग वाहून गेला आहे. त्यामुळे त्यात भरणी करून त्याचे मजबुतीकरण सध्या सुरू आहे. रेल्वेशिवाय पर्यायी रस्ता नसल्याने रुळांवरील विशेष मालवाहू गाडीचा वापर या कामासाठी केला जात आहे.

**तिसऱ्या मार्गिकेसाठी आठवडाभराची प्रतीक्षा...**

तिसरी मार्गिका सुरू होण्यासाठी आणखी आठवडाभर काम सुरू राहणार आहे. येत्या ३० जुलैपर्यंत मार्गिका सुरू होण्याची शक्यता आहे, असे ही रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले.

**आषाढीसाठी विशेष रेल्वे !**

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे होणाऱ्या सोहळ्यासाठी भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेत मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) ते मिरजदरम्यान एक मार्गी दोन विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष गाडीचे आरक्षण 'आयआरसीटीसी'सह सर्व आरक्षण केंद्रांवर सुरू झाले आहे.

गाडी क्रमांक ०११८३ विशेष गाडी २५ जुलै रोजी दुपारी ३.२० वाजता सीएसएमटीहून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ३.३० वाजता मिरज येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०११८१ विशेष गाडी २६ जुलै रोजी मध्यरात्री १२.२५ वाजता सीएसएमटीहून रवाना होईल आणि त्याच दिवशी सकाळी ११.२५ वाजता मिरज येथे पोहोचेल. दोन्ही विशेष गाड्यांना दादर, ठाणे, कल्याण, लोणावळा, पुणे, दौंड कुर्डुवाडी आणि पंढरपूर येथे थांबे आहेत. एक वातानुकूलित द्वितीय श्रेणी, तीन वातानुकूलित तृतीय श्रेणी, आठ शयनयान, चार सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन द्वितीय आसनांसह गार्ड्स ब्रेक व्हॅन अशा एकूण १८ डब्यांसह विशेष गाड्या धावणार आहेत.




## 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' भव्य कृतज्ञता शेतकरी मेळावा व सत्कार समारंभ

**अक्षराज : विकास सरवळे**




**दि.२४, पंढरपूर :** मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' भव्य कृतज्ञता शेतकरी मेळावा व सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते 'कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक कृषी पंढरी-२०२६' या राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, आमदार प्रशांत मालक परिचालक, आमदार राजेंद्र राऊत, आमदार समाधान आवताडे, आमदार विजय देशमुख, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार उत्तम जानकर, सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, जिल्हा परिषदेचे शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार - सावंत, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश सचिव माऊली भाऊ हळणवर, संदीप गिड्डे - पाटील, तसेच स्थानिक पदाधिकारी लोकप्रतिनिधी, इतर मान्यवर आणि सोलापूर जिल्ह्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुण्यात पुन्हा गोळीबार! वनराज आंदेकर प्रकरणातील मुख्य साक्षीदाराला संपवण्याचा प्रयत्न

**दि.२४, पुणे :** पुण्यात गुन्हेगारीने पुन्हा डोके वर काढले असून आज शुक्रवारी भरदिवसा एक खळबळजनक घटना घडली आहे. शहरातील घोरपडे पेठ परिसरातील पोलीस चौकीच्या समोरच एका तरुणावर अज्ञातांनी बेछूट गोळीबार केला. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे संपूर्ण परिसरात प्रचंड भीतीचं वातावरण पसरलं आहे. नूर असं गोळीबारात जखमी झालेल्या तरुणाचं नाव असून त्याच्यावर ३ गोळ्या झाडण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

**मुख्य साक्षीदारालाच संपवण्याचा प्रयत्न...**

मिळालेल्या माहितीनुसार, कासेवाडी परिसरातील कुख्यात परदेशी गँगशी संबंधित गुंडांनी हा हल्ला केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. घटना घडल्यानंतर आरोपींनी तातडीने घटनास्थळावरून पळ काढला. गंभीर जखमी झालेल्या नूर शेखला उपचारासाठी तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. विशेष म्हणजे, जखमी नूर शेख हा पुण्यात सर्वाच चर्चेत असलेल्या वनराज आंदेकर मर्डर केसमधील महत्त्वाचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असल्याची चर्चा आहे. पण पोलिसांनी यावर अद्याप कोणतीही अधिकृत माहिती दिली नाहीय.

**नाणेघाटात तरुणाचा थरारक अंत**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्याजवळ सीमेवर असलेल्या नाणेघाट परिसरातील 'नानाचा अंगठा' म्हणून प्रसिद्ध असलेल्या डोंगरावर पर्यटनासाठी गेलेल्या चार मित्रांपैकी एका २५ वर्षीय तरुणाचा भीषण अपघात झाला. तिथे फिरताना अचानक पाय घसरून



खोल दरीत कोसळल्यानं त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. तब्बल दोन दिवस चाललेल्या अत्यंत खडतर शोधमोहिमेनंतर मंगळवारी सकाळी मुरबाड येथील सह्याद्री गिरी रेस्क्यू टीमने या तरुणाचा मृतदेह दरीतून यशस्वीपणे बाहेर काढला.

**बराच वेळ उलटूनही परतला नाही**

दत्ता लोंढे (वय २२, रा. पारगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे) असं या अपघातात जीव गमावलेल्या तरुणाचं नाव आहे. मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, दत्ता लोंढे हा त्याचे मित्र तेजस काटे (वय २५), सुनील पवार (वय २३) आणि अनिकेत ढोबळे (वय २२) या तीन मित्रांसोबत पावसाळी पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी नाणेघाट परिसरात गेला होता. चौघेही मित्र नानाचा अंगठा डोंगरावर चढाई करत असताना अर्ध्या वाटेवर पोहोचले. त्यावेळी दत्ता लोंढे याने आपण परत खाली जात असल्याचं उर्वरित मित्रांना सांगितलं आणि तो एकटाच माघारी निघाला. मात्र, बराच वेळ उलटून गेल्यानंतरही दत्ता पार्किंगच्या ठिकाणी परत पोहोचलाच नाही. त्यामुळे चिंताग्रस्त झालेल्या त्याच्या मित्रांनी स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने परिसरात तातडीने शोध सुरू केला. तरीही त्याचा काहीच सुगावा न लागल्यानं अखेर या घटनेची माहिती जुन्नर पोलिसांना देण्यात आली होती.

# संपादकीय

## खुमासदार लेखणीचा बादशहा

महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकार, लोकप्रिय लेखक आणि अष्टपैलू स्तंभलेखक शिरीष कणेकर यांचा आज स्मृतिदिन. २५ जुलै २०२३ रोजी वयाच्या ८० व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या जाण्याने मराठी साहित्यविश्व, पत्रकारिता आणि असंख्य वाचकांच्या मनात मोठी पोकळी निर्माण झाली. त्यांच्या निधनाचा धक्का अनेकांना बसला, कारण मृत्यूच्या आदल्याच दिवशी त्यांनी लिहिलेला लेख वर्तमानपत्रात प्रकाशित झाला होता. एवढे सक्रिय असलेले व्यक्तिमत्त्व अचानक काळाच्या पडद्याआड जाईल, यावर विश्वास ठेवणे कठीण होते.

माझ्यासाठी तर त्यांचे निधन हा वैयक्तिक धक्का होता. शिरीष कणेकर हे माझे अत्यंत आवडते लेखक होते. त्यांची जवळपास सर्व पुस्तके मी वाचली आहेत. वर्तमानपत्रातील त्यांचे स्तंभ वाचतच मला स्तंभलेखनाची प्रेरणा मिळाली. त्यांच्या सहजसुंदर, खुसखुशीत आणि मिश्किल शैलीने लेखन कसे वाचकांच्या मनात घर करू शकते, याचा आदर्श त्यांनी घालून दिला.

चित्रपट आणि क्रिकेट हे त्यांच्या लेखनाचे दोन जिव्हाळ्याचे विषय. आज चाळीशी-पन्नाशीत असलेल्या अनेकांच्या आठवणींना त्यांनी आपल्या लेखणीतून उजाळा दिला. त्यांच्या लेखांमधून आम्हाला कुंदनलाल सैगल, दिलीप कुमार, राज कपूर, राजकुमार, अशोक कुमार, शम्मी कपूर, देव आनंद यांसारख्या दिग्गज कलाकारांची नव्याने ओळख झाली. त्याचबरोबर पन्नास ते ऐंशीच्या दशकातील क्रिकेटपटू, त्यांचे विक्रम, किस्से आणि त्या काळातील क्रिकेटचे सुवर्णयुग त्यांनी इतक्या रंगतदारपणे उभे केले की वाचक अक्षरशः त्या काळात रमून जायचे.

हिंदी चित्रपटसृष्टी, सिनेसंगीत आणि क्रिकेट यांवरील त्यांचा अभ्यास दांडगा होता. पण तो अभ्यास कधीही बोजड वाटत नसे. त्यांची विनोदबुद्धी, उपरोध, शब्दांवरील हुकमत आणि खुसखुशीत मांडणी यामुळे प्रत्येक लेख हा कट्ट्यावरच्या मैफलीसारखा वाटायचा. त्यामुळे तरुण वर्ग त्यांचा मोठा चाहता बनला. त्यांच्या लेखांत कृत्रिमता नव्हती; मित्रांशी गप्पा माराव्यात, तशी त्यांची शैली होती.

स्तंभलेखनातून लोकप्रिय झालेल्या शिरीष कणेकर यांनी मराठी साहित्यात अनेक गाजलेली पुस्तके दिली. यादों की बारात, शिरीषासन, सिनेमाबाजी, मुद्दे आणि गुद्दे, चहाटळकी, सुरपारंब्या, सिनेमगिरी, लागाव बत्ती, कणेकरी, चिमटे आणि गालगुच्चे, आसपास, मेतकूट, चित्ररूप, कल्चर-वल्चर हे त्यांचे गाजलेले सदरलेखन आजही रसिकांच्या स्मरणात आहे. गाये चला जा, एक्केचाळीस, गोळी मार भेजे में, गोतावळा, कुरापत, मखलाशी, फटकेबाजी, पुन्हा यादों की बारात, टिवल्या-बावल्या, चंची, चापट पोळी, डॉलरच्या देशा, एकला, रहस्यवल्ली, क्रिकेटवेध, नट-बोलट, बोलपट, सिनेमा डॉट कॉम यांसारख्या पुस्तकांनी वाचकांना अक्षरशः वेड लावले.

लेखनापुरतेच ते मर्यादित राहिले नाहीत. माझी फिल्लमबाजी, फटकेबाजी आणि आणि पुन्हा कणेकर या त्यांच्या स्टँड-अप कार्यक्रमांनाही प्रचंड प्रतिसाद मिळाला. त्यांच्या बोलण्यातही लेखनाइतकाच विनोद, मिश्किलपणा आणि सहजता होती.

त्यांना अनेक मानाचे पुरस्कार मिळाले; मात्र त्यांच्या दृष्टीने आणि वाचकांच्या दृष्टीने सर्वात मोठा पुरस्कार म्हणजे त्यांनी कमावलेले प्रेम. वाचकांच्या मनात त्यांनी निर्माण केलेले स्थान कोणत्याही सन्मानापेक्षा मोठे होते.

शिरीष कणेकर गेले आणि मराठीतील खुमासदार, मिश्किल आणि अभ्यासपूर्ण लेखणी जणू शांत झाली. त्यांच्या लेखांतून मिळणारी फिल्लमबाजी, फटकेबाजी आणि क्रिकेटच्या आठवणींची मैफल आता नव्याने अनुभवता येणार नाही, ही खंत कायम राहणार आहे. मात्र त्यांनी लिहिलेले शब्द आणि त्यांनी निर्माण केलेला वाचकांशी असलेला जिव्हाळा कायम जिवंत राहील.

शिरीष कणेकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

# आषाढी वारी : भक्ती, शक्ती आणि समतेचा महासंगम

श्रीक्षेत्र पंढरपूरचा लोकदेव विठोबा हा गरिबांचा देव आहे. द्वारकेचा राणा तिकडचे ऐश्वर्य त्यानें सोडून दिलें आणि देव भावाचा लंपट । सांडून आलासे वैकुंठ ।।अशी नोंद पुराणात आहे. वारकरी पंथ हा अडाणी लोकांचा पंथ आहे, असा पुष्कळांचा समज आहे; पण त्यांत तिळमात्र तथ्य नाहीं. भोळीभाबडी भक्ति हाच त्या पंथाचा आधार असल्यामुळे हजारों लोक गेली शेकडो वर्षे दरवर्षी आषाढी -कार्तिकी वारीच्या निमित्ताने त्यांत सामील होत असतात. वारकरी पंथांत विठ्ठलभक्तीचा महिमा विशेष आहे. निवृत्तिनाथ ते निळोबा अशी वारकरी परंपरा आहे. या पंथानें विद्वत्तेचें अवडंबर माजविलें नाहीं हे खरें; परंतु त्यानें अंधभक्तीलाहि कोठेंच थारा दिलेला नाहीं. वात्सल्य, दयाशीलता, सहिष्णुता, क्षमाशीलता इत्यादि गुणांनीं तो संपन्न आहे. विठाई ही खरी अनाथांची माउली आहे. म्हणूनच तिच्याशी प्रेमानें सलगी करतांना भक्तांना कधीं संकोच किंवा भीति वाटत नाहीं. ''ज्ञानदेव तु कैवल्यम्' हे वेदान्ताचें मुख्य सूत्र त्यानें कधींहि सोडलें नाहीं. नाम संकीर्तनासारख्या सहजसुलभ साधनाचा त्यानें उदोउदो केला; पण साधनाच्या दृष्टीनें ही केवळ पहिली पायरी आहे हें त्यानें वारंवार व निक्षून सांगितलें आहे. वारकरी संप्रदाय अद्वैती असल्यामुळे अद्वैत तत्त्वज्ञानाचे निरूपण असलेले सर्व ग्रंथ वारकऱ्यांना शिरोधार्य आहेत. त्यातही गीता आणि भागवत हे दोन्ही ग्रंथ वारकऱ्यांच्या नित्य पठणात असतात. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत इत्यादी श्रेष्ठ ग्रंथ वारकऱ्यांना पवित्र आहेत. 'गीता भागवत करिती श्रवण। अखंड चिंतन विठोबाचे ।।' अशी वारकऱ्याची महत्त्वाची खूण तुकाराम महाराजांनी सांगितली आहे. त्याशिवाय ज्ञानेश्वरी व ज्ञानेश्वरांचे अन्य सर्व ग्रंथ, नामदेव महाराजांची अभंग गाथा, एकनाथ महाराजांचे एकनाथी भागवत म्हणजेच भागवताच्या एकादश स्कंदावरील टीका, तुकाराम महाराजांची अलौकिक गाथा, नाथांचेच भावार्थ रामायण आणि या सर्वांच्या जोडीला वारकरी संप्रदायाच्या सर्व संतांची अभंग रचना वारकऱ्याला प्रमाण आहे. त्या सर्व संतांची अभंगसंपदा सर्व वारकऱ्यांना अत्यंत प्रिय आहे. आपल्या ग्रंथातून सर्व संतांनी अद्वैत तत्त्वज्ञानच सांगितले आहे. ज्ञानेश्वरी आणि तुकोबांची गाथा ही वारकऱ्यांना सर्वाधिक प्रिय म्हणावी लागतील. त्याखालोखाल नाथांचे भागवत येते. यांच्या तुलनेत नामदेव महाराजांची अभंगसंपदा मात्र काहीशी उपेक्षित राहिली. नामदेवांच्या बाबतीत झालेली उपेक्षा दुसऱ्या भक्तिखंडात विशेष करून प्रस्तावनेत आली आहे. परंतु सर्व संतांचे अभंग वारकऱ्यांना प्रिय असतात

वारकरी पंथ हा सर्वसंग्राहक आहे. त्यानें संकुचित सांप्रदायिकता बाळगली नाहीं, प्रतीकाचा दुराग्रह धरला नाहीं, दैवतावर रणें माजविली नाहींत. परमेश्वर सर्वव्यापी आहे व तो विविध रूपांनी नटलेला आहे; तुका म्हणे हरि। अवघा एकला ।। परी हा धाकुला। भक्तीसाठीं ।। म्हणून उपासकांची भावनाच मुख्य आहे, प्रतिमा गौण आहे, याची जाणीव त्यांना होती. त्यामुळे राम, कृष्ण, दत्त, शिव इत्यादि दैवतांच्या भक्तांना त्यांनी आपल्यांत सामावून घेतले. वारकरी संतांनी तर नेहमींच विष्णु व शिव यांच्या ऐक्यावर भर दिला आहे. शिव मस्तकी धरिला। भेद मक्तांचा काढिला ।। लक्षावधी शूद्राशूद्राना या दयामय दैवतानें आत्मोद्धाराची प्रेरणा दिली आहे, बंधुभावाचे पाठ दिले आहेत. मात्र संतांच्या मताप्रमाणे 'विठोबा हा वारकऱ्यांच्या दृष्टीने राम, कृष्ण व विठ्ठल हे तिथेहि एकाच परमेश्वराचे अवतार आहेत.

लोकांत श्रद्धा होतीच, तिला संतांनी डोळसपणा आणला. बहुजनसमाजाच्या आत्मिक उन्नतीसाठीं त्यांनी वारकरी पंथाला नवें वळण लावलें. संत ज्ञानेश्वर हे वास्तववादी धर्मसुधारक होते. महाराष्ट्रातील सर्वच संतांनी अध्यात्मविद्या ही आतां केवळ दशग्रंथी ब्राह्मणांची मिरास राहिली नाहीं. वारकरी पंथानें संतांनीच निर्माण केलेल्या




ग्रंथसाहित्यातून लोकांतून धर्मप्रवक्ते तयार केले. आम्हां 'कीर्तन' कुळ धाडी अश्या भावनेनें ते आपला जन्मसिद्ध हक्क गाजवू लागले. संत ज्ञानेश्वरांच्या भावार्थ दीपिकेनें या लोकांना कवित्वाची प्रेरणा, तशीच कीर्तनाची स्फूर्ति दिली. वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा। येरांनी वाहावा भार माथां ! असें आव्हानपूर्वक म्हणण्याइतका आत्मविश्वास संत तुकारामांसारख्या कुणब्याने सर्वदूर महाराष्ट्रात विविध ठिकाणी उत्पन्न झाला.

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा संप्रदाय असल्यामुळे पंढरीच्या वारीसाठी सर्व महाराष्ट्रातून अनेक दिंड्या व फड वर्षानुवर्षे भुवैकुंठात दाखल होतात. त्यात आळंदीहून निघणारी ज्ञानोबांची दिंडी सर्वात प्रभावी आहे. आळंदीहून येणारी ही दिंडी हैबतबाबांची असून वारीची सात्त्विक परंपरा दृढमूल करण्याचे श्रेय आधुनिक काळात हैबतबाबांनाच आहे. त्र्यंबकेश्वर (निवृत्तिनाथ), सासवड (सोपानकाका), एदलाबाद (मुक्ताई), पैठण (एकनाथ महाराज), देहू (तुकाराम महाराज) या मोठ्या दिंड्याही वारीसाठी पंढरीत येतात. त्याशिवाय अरणभेंडीहून सांवता महाराज, मंगळवेढ्याहून चोखोबा महाराज, तेरढोकीहून गोरोबाकाका, लऊळहून कुर्मदास महाराज यांच्या दिंड्याही पंढरीत उत्सवासाठी अक्षय परंपरेने येतात. नेवाशाहूनही दिंडी पंढरीत येते. वारकरी संप्रदायाची सात्त्विक परंपरा प्रामुख्याने महाराष्ट्रातील नामवंत फडांनी टिकविली आहे. वारकऱ्याचा आचार पाळणारे आणि पंढरीशाला भजणारे वारकरी महाराष्ट्रात लक्षावधी आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ते पसरले आहेत. अनेक गावात, शहरात हजारो वर्षे हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून लोकांचे प्रबोधन करीत आहेत. लाखोंची वारी किंवा होणारे नामसंकीर्तन हे न चुकता सर्व शिस्तीने घडते आहे. याचे सर्व श्रेय संतांच्या ग्रंथसंपदेला आणि निरूपणाच्या माध्यमातून मशागत करण्याऱ्या लाखोंच्या भक्तांना जाते. त्यातही या संप्रदायात खोलवर रुजलेली फड परंपरेनी महत्वाची कामगिरी केली आहे. त्या त्या स्थळी असलेल्या वारकरी प्रमुख आणि त्यांच्या शिष्य मंडळींचा एकत्रित, संघटित, शिस्तबद्ध आणि सदाचारी समुदाय म्हणजे फड म्हणता येईल. पंढरीच्या वारीची शिस्त आणि कीर्तनभक्ती व नामस्मरण यांची अक्षुण्ण परंपरा या फडांमुळे अधिकच समृद्ध झाली आहे. स्वकर्म आचरल्यानंतर दिवसातील काही वेळ मुद्रा, भजन, कीर्तन, पाठांतर, मंत्रजप यासाठी प्रत्येक वारकऱ्याने द्यावयाचा असतो. वारकरी संप्रदाय हा खऱ्या अर्थाने सात्त्विक पंथ आहे. या संप्रदायाचे अनुयायी प्रामुख्याने बहुजन समाजातील असून गरीब कुटुंबातील असतात. परंतु त्यांची नीतिमत्ता, आदर्श, सदाचारी वर्तणूक बहुसंख्य वारकऱ्यांच्या कर्तव्यातून आणि कर्मातून सहजपणे प्रगट होत असते. पंढरी आणि देहू आळंदीच्या वाटेवर असताना वारकऱ्यांची ही सदाचारता निःसंशय प्रत्ययाला येते.

**– रवींद्र मालुसरे**
**अध्यक्ष,मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई**
**९३२३११७७०४**

# दिल्ली प्रोटेस्ट : आंदोलनाचा आवाज दाबणार की प्रश्न सोडवणार?

देशाच्या भवितव्याचा पाया जर शिक्षण असेल, तर त्या शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास हा राष्ट्राच्या प्रगतीचा आत्मा असतो. मात्र जेव्हा स्पर्धा परीक्षांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते, कथित पेपरफुटी आणि गैरप्रकारांच्या बातम्या समोर येतात, तेव्हा केवळ एक परीक्षा संशयाच्या भोवऱ्यात सापडत नाही तर लाखो विद्यार्थ्यांची स्वप्ने, पालकांचा विश्वास आणि देशाच्या भविष्याची चिंता हादरते. दिल्लीतील जंतर-मंतरवर सुरू असलेले सीजेपीचे आंदोलन याच अस्वस्थतेचे प्रतिबिंब म्हणून पाहिले जात आहे. विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्न सरळ आहे की मेहनत, गुणवत्ता आणि प्रामाणिकपणाला न्याय मिळणार आहे की पैशाच्या आणि गैरप्रकाराच्या शक्तीसमोर ते पुन्हा पराभूत होणार? या आंदोलनाला वेगळे नैतिक आणि सामाजिक परिमाण मिळाले ते सोनम वांगचुक यांच्या सहभागामुळे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना पाठिंबा देत त्यांनी उपोषण केले. प्रकृती खालावल्यानंतर त्यांना रुग्णालयात हलविण्यात आले, तरी आंदोलनाचा आवाज थांबला नाही. त्यानंतर सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी उपोषणाची धुरा स्वीकारली. २० जुलै रोजी संसदेकडे 'चलो संसद' मोर्चाची हाक देण्यात आली आणि त्यानंतर दिल्लीतील आंदोलनाने राष्ट्रीय पातळीवर लक्ष वेधून घेतले. लोकशाहीत आंदोलन करणे हा संविधानिक अधिकार आहे. शासनाच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित करणे म्हणजे राष्ट्रविरोध नव्हे. उलट, जनतेच्या प्रश्नांकडे सत्तेचे लक्ष वेधण्याचे आंदोलन हे लोकशाहीतील एक महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे प्रश्न असा आहे की, आंदोलनाचा आवाज दाबायचा की त्या आवाजामागील वेदना समजून घ्यायच्या?

२० जुलै रोजी जंतर-मंतर आणि संसद परिसराकडे जाणाऱ्या मार्गांवर मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला. आंदोलक आणि सुरक्षा यंत्रणांमध्ये तणाव निर्माण झाला. पोलिसांनी अश्रुधुराचा वापर आणि लाठीचार्ज केल्याचे वृत्त आले, तर काही ठिकाणी आंदोलकांकडून दगडफेकीचे आरोपही झाले. या घटनांनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. जर आंदोलकांनी कायदा मोडला असेल, तर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे पण पोलिसांकडूनही मर्यादा ओलांडल्या गेल्या असतील, तर त्याची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. लोकशाहीत कायदा सर्वांसाठी समान असतो, आंदोलकांसाठीही आणि प्रशासनासाठीही. २० जुलैच्या घटनांनंतरही आंदोलन थांबले नाही. उलट, जंतर-मंतरवरील संघर्ष अधिक तीव्र झाला. २२ जुलैला आंदोलनस्थळ पुन्हा सक्रिय झाल्याचे वृत्त आले आणि २३ जुलैपर्यंतही सीजेपी आंदोलन सुरूच आहे. दरम्यान केंद्र सरकारने चर्चेची तयारी दर्शविल्याचे वृत्त आहे, मात्र आंदोलकांनी सरकारच्या प्रतिसादाला



अपुरे मानत केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी कायम ठेवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेपरफुटी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची भूमिका व्यक्त केली असली, तरी आंदोलकांचा प्रश्न केवळ दोषींना शिक्षा देण्यापुरता मर्यादित नाही; त्यांना उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि भविष्यातील परीक्षांची विश्वासार्हता याची हमी हवी आहे.

आज विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास हा या संपूर्ण प्रकरणातील सर्वात मोठा धोका आहे. स्पर्धा परीक्षा म्हणजे गुणवत्तेची कसोटी न राहता पैशांची आणि संपर्कांची स्पर्धा झाली, अशी भावना तरुणांच्या मनात निर्माण झाली तर त्याचे परिणाम अत्यंत गंभीर असतील. एका विद्यार्थ्याचे वर्ष वाया जाणे म्हणजे केवळ एका व्यक्तीचे नुकसान नाही, त्यामागे एका कुटुंबाची आर्थिक गुंतवणूक, पालकांची स्वप्ने आणि विद्यार्थ्याची मानसिक झुंज असते. उद्याचे डॉक्टर, अभियंते, वैज्ञानिक, प्रशासकीय अधिकारी, न्यायाधीश आणि लोकप्रतिनिधी आजच्या वर्गखोल्यांमध्ये घडत आहेत. त्यामुळे त्यांच्या मनातील विश्वास तुटणे म्हणजे देशाच्या भविष्याच्या पायाभरणीतच तडे जाणे होय. या आंदोलनाला विविध राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि सार्वजनिक क्षेत्रातील व्यक्तींकडून पाठिंबा मिळत असल्याचे वृत्त आहे. मात्र आंदोलनाला राजकीय पाठिंबा मिळाला म्हणून त्यातील मूळ प्रश्न गौण ठरत नाही. उलट, सत्ताधारी आणि विरोधकांनी राजकीय आरोप-प्रत्यारोप बाजूला ठेवून विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर हाताळला पाहिजे. हा प्रश्न कोणत्याही एका पक्षाचा नसून, प्रत्येक पालकाचा आणि प्रत्येक विद्यार्थ्याचा आहे.

मात्र या संपूर्ण प्रकरणात एक महत्त्वाची सावधगिरी आवश्यक आहे. कोणत्याही तपासाआधी कोणालाही दोषी ठरविणे योग्य नाही. पेपरफुटी किंवा गैरप्रकाराच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. त्याचबरोबर परीक्षेची प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते वितरण, परीक्षा केंद्र आणि निकालापर्यंतची संपूर्ण व्यवस्था अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्याची गरज आहे. तंत्रज्ञानाचा वापर, स्वतंत्र देखरेख यंत्रणा आणि विद्यार्थ्यांशी थेट संवाद या उपाययोजना तातडीने करण्याची आवश्यकता आहे. दरम्यान, २३ जुलैच्या घडामोडींमध्ये आणखी एक महत्त्वाचा मुद्दा पुढे आला आहे. दिल्ली पोलिसांनी राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत अधिकार विस्ताराचा आदेश सीजेपी आंदोलनाशी संबंधित नसून नियमित प्रशासकीय नूतनीकरण असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे अशा संवेदनशील काळात सोशल मीडिया पोस्ट किंवा अपुष्ट दाव्यांपेक्षा अधिकृत माहिती आणि तथ्यांवर विश्वास ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. आंदोलनाच्या नावाखाली हिंसा करणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे; पण शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा आवाजही ऐकला गेला पाहिजे.

आज आणखी एक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे की, सरकार आणि आंदोलक यांच्यातील संवादाची दारे खरोखर उघडी आहेत का? सरकार चर्चेची तयारी दर्शवत असेल तर ती चर्चा प्रत्यक्षात झाली पाहिजे. आंदोलकांनीही संवादाची संधी नाकारता कामा नये. कारण लोकशाहीतील कोणताही संघर्ष शेवटी संवादाच्या टेबलावरच संपतो. रस्त्यावरचा संघर्ष जितका लांबतो, तितकी समाजातील अस्वस्थता वाढते. २० जुलैच्या घटनांनी देशासमोर एक मूलभूत प्रश्न उभा केला आहे, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तर पोलिसी बळाने मिळणार की संवादाने? आंदोलनकर्त्यांनी कायदा हातात घेऊ नये, हे जितके खरे आहे, तितकेच प्रशासनानेही संयम राखून कायद्याच्या चौकटीत वागणे आवश्यक आहे. सरकारची ताकद विरोध दडपण्यात नसते; तर विरोध ऐकून त्यावर योग्य उत्तर देण्यात असते.

आज २३ जुलैला दिल्लीतील आंदोलन एका निर्णायक वळणावर आहे. एका बाजूला सरकारकडून चर्चेची तयारी, दुसऱ्या बाजूला आंदोलकांच्या मागण्यांवरील ठाम भूमिका आणि तिसऱ्या बाजूला वाढता राजकीय हस्तक्षेप. या तिन्हींच्या छेदनबिंदूवर विद्यार्थ्यांचे भविष्य उभे आहे. दिल्ली उच्च न्यायालयात आंदोलनासंदर्भातील याचिकेवर सुनावणी होणार असल्याचेही वृत्त आहे. त्यामुळे आता या संघर्षाला कायदेशीर आणि लोकशाही मार्गाने तोडगा काढण्याची जबाबदारी सर्व संबंधित घटकांवर आहे. या आंदोलनाचा शेवट कोणाच्या विजयाने किंवा पराभवाने होऊ नये, विजय झाला पाहिजे तो विद्यार्थ्यांच्या विश्वासाचा. प्रश्नपत्रिका फुटली की केवळ एक परीक्षा भ्रष्ट होत नाही, तर समान संधीचा घटनात्मक अधिकार जखमी होतो. एका विद्यार्थ्याची मेहनत जर पैशाच्या आणि गैरप्रकाराच्या शक्तीसमोर हरली, तर त्याचा पराभव केवळ त्या विद्यार्थ्याचा नसतो. तो संपूर्ण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेचा पराभव असतो. म्हणून प्रश्नपत्रिका फुटल्याच्या प्रत्येक आरोपाची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे, दोषी कोणीही असो त्याच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे आणि भविष्यात अशा घटना घडणार नाहीत, यासाठी अभेद्य, पारदर्शक आणि विश्वासार्ह परीक्षा व्यवस्था उभी केली पाहिजे.

देशाला आंदोलनाची आग नको, तर न्यायाचा प्रकाश हवा आहे. विद्यार्थ्यांना संघर्ष नको तर विश्वास हवा आहे. सरकारला विरोध नको असेल, तर जनतेचे प्रश्न ऐकावे लागतील आणि विद्यार्थ्यांना पुन्हा रस्त्यावर उतरावे लागू नये असे वाटत असेल, तर त्यांच्या भविष्याची हमी घोषणांमधून नव्हे, तर कृतीतून द्यावी लागेल. कारण राष्ट्राची खरी उभारणी केवळ संसद भवनाच्या भिंतींवर होत नाही तर ती उभी राहते विद्यार्थ्यांच्या डोळ्यातील स्वप्नांवर, पालकांच्या विश्वासावर आणि गुणवत्तेला मिळणाऱ्या न्यायावर. आता वेळ आहे आंदोलनाचा आवाज दाबण्याची नव्हे, तर तो ऐकण्याची आश्वासन देण्याची नव्हे, तर उत्तरदायित्व स्वीकारण्याची आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, देशाच्या भावी पिढीच्या भविष्याला न्याय देण्याची!

**- प्रवीण बागडे**
**नागपूर, ९१२३६२०९११**

## सेवा, श्रद्धा, समर्पण आणि एकतेचा संदेश देणारी पंढरीची वारी

गेल्या काही दिवसांपासून ज्याचे वेध लागले आहेत. ते अवघ्या महाराष्ट्राचे दैवत श्री क्षेत्र पंढरपूर येथील विठोबा - रखुमाई या दैवतांची आषाढी वारी सोहळा आणि त्याचं अनुषंगाने प्रत्येक वारकरी, भक्त हा सोहळा अनुभवण्यासाठी याची आतुरतेने वाट पाहत असतो यंदाची आषाढी वारी २५ जुलै रोजी संपन्न होत असल्याने लाखो वारकरी भक्तांचे पाय विठ्ठलाच्या नगरीकडे अर्थातच श्रीक्षेत्र पंढरपूरकडे वळतांना दिसतात..... निवृती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम या जयघोषाच्या निनादात पाऊले चालती पंढरीची वाट असे म्हंटले तरी वावगे ठरणारं नाही आषाढी वारीमध्ये जात, पात, धर्म, उच्च, निच्च , गरीब - श्रीमंत असा कोणताही भेदभाव न करता आपल्या घरादारांसह मुलाबाळांची, संसाराची सर्वकांही जबाबदारी पांडुरंगावर सोपवून यामध्ये लिन होतात फक्त आणि फक्त टाळ मृदंगाच्या गजरात विठुरायाचा जप केला जातो आजच्या डिजिटल युगातही वारकऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होताना दिसून येते आहे. स्नेह आणि ज्ञानाची जीवनमूल्ये अधिक वाढावीत, सर्वांमधला चैतन्याचा अंश एकच आहे. ही मनोधारणा वाढावी हाच वरीचा संदेश आहे वारी आषाढ आणि कार्तिक महिन्यातील शुद्ध एकादशी अशा दोन्ही वेळा होते. आळंदी येथून संत ज्ञानेश्वर यांच्या पादुका तर देहू येथून संत तुकाराम यांच्या पादुका पालखीत ठेवून ती पालखी रथातून पंढरपूर येथे मार्गस्थ होते. दरम्यान याचं वेळी पालखी, रिंगण सोहळ्याचे दर्शन घेण्यासाठी भाविक भक्त, वारकरी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवितात वारी फक्त अध्यात्मिक सोहळा नाही ती सामाजिक आणि आरोग्याची चळवळ आहे. शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास करतांना शिस्त, सयंम, परोपकार आणि साधेपणाचे आचरण वारकरी दाखवतात कोणताही गोंधळ न करता स्वच्छतेची आणि शिस्तीची मिसाल जगापुढे ठेवणारी हि वारी जगात दुर्मिळ असून सेवा, श्रद्धा, समर्पण आणि एकतेचा संदेश देणारी अशी ही पंढरीची वारी..... या सोहळ्यानिमित्त सर्वांना शुभेच्छा !

**– राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

## सोने..

पांडुरंग भोळा
रंग कुट्ट काळा
तरी दे उजाळा
अंतरंगा

पांडुरंगा गळा
तुळशीचे माळा
सोने शत तोळा
भासे जणूं

लावियेला टिळा
बुक्का कपाळा
खुश लडिवाळा
तेवढ्याने

भक्त होई गोळा
रमतो तो खुळा
फुलवितो मळा
आत्मानंदा

पाहता हरि रुपा
चंद्र भागा डोळा
वाहे घळा घळा
भक्ती भाव

विठ्ठल लडिवाळा
कसा रे जिव्हाळा
कधी नसे कंटाळा
तुझ्या संगे

सर्वत्रचं सावळा
मनाकरी बावळा
बा तुझाचं दर्वळा
आयुष्यात

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

## चातुर्मासारंभ

आषाढ शुद्ध एकादशीपासून कार्तिक शुद्ध एकादशीपर्यंत अथवा आषाढ पौर्णिमेपासून कार्तिक पौर्णिमेपर्यंत होणार्या चार मासांच्या काळास 'चातुर्मास', असे म्हणतात. मनुष्याचे एक वर्ष ही देवांची एक अहोरात्र असते.

'जसजसे एका माध्यमातून दुसर्या माध्यमात जावे, तसतसे काळाचे परिमाण पालटते', हे आता अंतरिक्षयात्री चंद्रावर जाऊन आले, तेव्हा त्यांना आलेल्या अनुभवावरून सिद्धही झाले आहे. दक्षिणायन ही देवांची रात्र असून उत्तरायण हा त्यांचा दिवस असतो. कर्क संक्रांतीस उत्तरायण पूर्ण होते आणि दक्षिणायनास प्रारंभ होतो, म्हणजेच देवांची रात्र चालू होते. कर्क संक्रांत आषाढ मासात येते; म्हणूनच आषाढ शुद्ध एकादशीस 'शयनी एकादशी' म्हटले आहे; कारण 'त्या दिवशी देव झोपी जातात', अशी समजूत आहे. कार्तिक शुद्ध एकादशीस देव झोप घेऊन उठतात; म्हणून तिला 'प्रबोधिनी (बोधिनी, देवोत्थानी) एकादशी' असे म्हणतात.

वस्तूतः दक्षिणायन सहा मासांचे असल्यामुळे देवांची रात्रही तेवढीच असायला हवी; पण बोधिनी एकादशीपर्यंत चारच मास पुरे होतात. याचा अर्थ असा की, एक तृतीयांश रात्र शिल्लक आहे, तोच देव जागे होतात आणि आपले व्यवहार करू लागतात.' 'नवसृष्टीनिर्मिती हे ब्रह्मदेवाचे कार्य चालू असतांना पालनकर्ता श्रीविष्णु निष्क्रिय असतो; म्हणून चातुर्मासास विष्णुशयन म्हटले जाते. तेव्हा श्रीविष्णु क्षीरसागरात शयन करतो, असे समजतात. आषाढ शुद्ध एकादशीला विष्णुशयन, तर कार्तिक शुद्ध एकादशीनंतर म्हणजे द्वादशीला विष्णुप्रबोधोत्सव साजरा केला जातो.' 'सर्वसामान्य लोक चातुर्मासात एखादे व्रत करतात.

पर्णभोजन (पानावर जेवण करणे), एकभोजन (एक वेळेस जेवणे), अयाचित (न मागता मिळेल तेवढे जेवणे), एकवाढी (एकदाच सर्व पदार्थ वाढून घेणे), मिश्रभोजन (सर्व पदार्थ एकदम वाढून घेऊन त्याचा काला करून जेवणे) इत्यादी भोजननियम करता येतात.' 'कित्येक स्त्रिया चातुर्मासात 'धरणे-पारणे' नावाचे व्रत करतात. यात एक दिवस भोजन आणि दुसर्या दिवशी उपवास, असे सतत चार मास करायचे असते. कित्येक स्त्रिया चातुर्मासात एक किंवा दोन धान्यांवर रहातात. काही एकभुक्त रहातात. देशपरत्वे चातुर्मासातले असे विविध आचार दृष्टीस पडतात.

**– सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.
Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं. डब्लू- २३०, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरीया, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, जि. ठाणे, पिन कोड - ४०० ७१०, महाराष्ट्र येथे मुद्रित करून, प्रशांत अरुण चव्हाण, हाउस नं.९२६/३, फ्लॅट ३०१, सेक्टर १अ, नेरुळ, नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०६ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद ठाणे न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail. com संपादक : प्रशांत अरुण चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्याकडे राहील.) मोबा.: ८६०५३१३२०२

# वारकऱ्यांच्या चरणसेवेच्या माध्यमातून भारताच्या युवा शक्तीचे दर्शन - मुख्यमंत्री फडणवीस

## उपस्थितीत 'निर्मलवारी-समृद्धवारी' व 'चरणसेवा' उपक्रमाचा समारोप




**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२४, पंढरपूर :** चरणसेवा उपक्रमाच्या माध्यमातून डॉक्टर आणि स्वयंसेवक आपल्या आई वडिलांप्रमाणे भक्तीभावाने थकलेल्या वारकऱ्यांची चरणसेवा केली आणि त्यांना सर्व प्रकारच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन दिल्या. वारकऱ्यांच्या सेवेच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने भारताच्या युवा शक्तीचे चित्र, भारत आणि महाराष्ट्र धर्म पाहायला मिळतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. पंचायत समिती, पंढरपूर येथे ग्रामविकास आणि पंचायतराज विभागातर्फे आयोजित 'निर्मलवारी-समृद्धवारी' आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या 'चरणसेवा' उपक्रमाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जलसंपदा तथा आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे उपस्थित होते.

श्री. फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रसारख्या पुरोगामी आणि भक्ती मार्गाची समृद्ध परंपरा असलेल्या या राज्यात वारकऱ्यांसाठी सुविधा उपलब्ध करुन देणे राज्य शासनाचे कर्तव्य आहे. त्यादृष्टीने सन २०१६ पासून सेवा सहयोग संस्थेच्या माध्यमातून पहिल्यांदा निर्मल वारी उपक्रम सुरु केला आणि सन २०१७ पासून राज्याच्या अर्थसंकल्पात आणून जिल्हा प्रशासन आणि सहयोग संस्था माध्यमातून वारी निर्मल वारी करण्याच्यादृष्टीने मोठ्या प्रमाणात शौचालय, स्नानगृह, स्वच्छता आदी व्यवस्था सुविधा सुरु केल्या. वारकऱ्यामध्ये विठू माऊली असल्याने त्याची सेवा करणे हे आपले परम कर्तव्य मानून या भावनेतून या व्यवस्था निर्माण करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री म्हणाले, संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यासोबत इतर दिंड्याकरिता शौचालयाची व्यवस्था करण्यात आली. वारी दरम्यान १३ लाख चौरस फूट जर्मन हँगर करण्यात आले. ५ हजार फिरती शौचालये देण्यात आली. वारीला निर्मलवारी करणारे स्वच्छतादूत हे देवदूतच आहेत. राज्यातील १४ जिल्ह्यात वारीच्या अनुषंगाने अतिशय उत्तम नियोजन करण्यात आले असून याबाबत वारकऱ्यांनी समाधान व्यक्त केले, असेही ते म्हणाले.

पंढरपूर येथील वाळवंट स्वच्छ करुन चंद्रभागा नदीचे पाणी स्वच्छ पोहोचविण्याच्यादृष्टीने व्यवस्था करण्यात आली आहे. सुमारे ३० ते ३५ लाख वारकरी पंढरपूर येथे आल्यानंतरही संपूर्ण पंढरपूर स्वच्छ दिसत आहे. वारीचा कालावधी संपल्यानंतरही पंढरपूर असेच स्वच्छ राहील, अशी अपेक्षा श्री. फडणवीस यांनी व्यक्त केली.


मुख्यमंत्र्यांनी यावेळी लोकप्रतिनिधी, सोलापूर, सातारा आणि पुणे जिल्हाप्रशासन, पोलीस प्रशासन, विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी, निर्मलवारीमध्ये विविध परंपरांच्या माध्यमातून जनजागृती करणारे कलावंत तसेच वारी यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व घटकांचे कामाचे कौतुक केले.

श्री. गोरे म्हणाले, वारीमध्ये वारकऱ्यांना सुविधा देताना स्वच्छतेला प्राधान्य देण्यात आले. चरणसेवा उपक्रमासोबतच मुख्यमंत्री वारकरी सुविधा केंद्रामध्ये, हिरकणी कक्ष, रुग्णालय, शौचालय, स्नानगृह, जर्मन हँगर, मोबाईल चार्जिंग वाहन आदी उपलब्ध करुन देण्यात आल्या. त्यांना हक्काच्या मुक्कामाचे ठिकाण उपलब्ध करुन देण्यात आल्याबद्दल वारकरी समाधान व्यक्त करीत होते. यामध्ये जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन, सेवा भावी संस्था, स्वच्छता दूत, नागरिक यांनी मनापासून योगदान दिले.

स्वच्छता कर्मचाऱ्यांनी जबाबदारी न समजता सेवा म्हणून कार्य केले. यामुळे ही संपूर्ण वारी साथीच्या रोगापासून मुक्त झाली आहे, वाळवंट व चंद्रभागा नदी स्वच्छ करण्यात आली असून एकूणच संपूर्ण पंढरी स्वच्छ करुन वारकऱ्यांच्या स्वागतासाठी सज्ज करण्यात आली आहे. आषाढीवारीमध्ये सर्व वयोगटातील नागरिक सहभागी होवून राज्य शासनाच्या सर्व सेवांचा लाभ घेतला आहे, असेही श्री. गोरे म्हणाले. श्री. जैन यांनी आषाढीवारीमध्ये सहभागी वारकऱ्यांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधांची माहिती दिली. सातारा, सोलापूर जिल्ह्यात १३ लाख चौरस फूट जर्मन हँगर, ७ लाख ८० चौरस फूट जलरोधक मंडप उभारण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते स्वच्छ भारत मोहिमेत महाराष्ट्र प्रथम स्थानी आल्याबद्दल संचालक शेखर रौंदळ तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या 'चरणसेवा' उपक्रमात सेवा बजावणाऱ्या डॉक्टर व सेवा भावी संस्था आणि आषाढी वारीतील स्वच्छतादूतांचा सन्मान करण्यात आला. 'स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२६' बोधचिन्हाचे अनावरणही याप्रसंगी करण्यात आले.कार्यक्रमात 'निर्मलवारी-समृद्धवारी' व 'चरणसेवा' उपक्रमाचे माहितीपट दाखविण्यात आले. कार्यक्रमाला आमदार राजेंद्र राऊत, गोपीचंद पडळकर, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, विजयकुमार देशमुख, नारायण पाटील, नंदकिशोर महाजन, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, विभागीय आयुक्त शितल तेली-उगले, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक आदी उपस्थित होते.

# पनवेलमधील नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयाची दुरवस्था; छत गळती, अस्वच्छतेमुळे रुग्ण त्रस्त



**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.२४, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल महानगरपालिका हद्दीतील नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयाच्या देखभालीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर आले आहे. रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळील छताला गळती लागली असून पावसाचे पाणी थेट रुग्णालयात साचत आहे. विशेष म्हणजे ही समस्या अनेक दिवसांपासून कायम असतानाही दुरुस्तीचे काम अद्याप करण्यात आलेले नाही. गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी २०२२ साली या १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाची स्थापना करण्यात आली. रुग्णालयात २० खाटांचे अत्याधुनिक ट्रॉमा सेंटर, ओपीडी (OPD), आयपीडी (IPD), एक्स-रे विभाग, फिजिओथेरपी सेवा,अपघात विभाग तसेच सुसज्ज ऑपरेशन थिएटरची सुविधा उपलब्ध आहे. मात्र उपलब्ध सुविधांच्या तुलनेत रुग्णालयाच्या देखभाल व स्वच्छतेच्या बाबतीत गंभीर त्रुटी दिसून येत आहेत. रुग्णालयातील शौचालये व स्नानगृहे अनेक ठिकाणी अस्वच्छ अवस्थेत असल्याची तक्रार रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून करण्यात येत आहे. आरोग्य संस्थेमध्ये स्वच्छतेला विशेष महत्त्व असताना अशा परिस्थितीमुळे रुग्णांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.रुग्णालयात नियमित साफसफाई केली जात असल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्ष परिस्थिती त्याला छेद देणारी असल्याचे दिसून येते. तसेच सफाई कर्मचाऱ्यांना वेळेवर मानधन किंवा वेतन मिळत नसल्याची माहितीही समोर आली आहे. त्यामुळे सफाई व्यवस्थेवर परिणाम होत असल्याचे बोलले जात आहे.प्रथमदर्शनी पाहता रुग्णालयाच्या स्वच्छतेचे कंत्राट ज्या संस्थेला किंवा कंत्राटदाराला देण्यात आले आहे,त्यांच्याकडून या कामाकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याचे दिसते. परिणामी रुग्णालयाच्या काही भागांमध्ये अस्वच्छता आणि गैरसोयींचे चित्र निर्माण झाले आहे.आरोग्य विभाग आणि संबंधित प्रशासनाने या समस्यांची तातडीने दखल घेऊन छताची दुरुस्ती,स्वच्छता व्यवस्थेचे नियोजन आणि कर्मचाऱ्यांच्या वेतन संबंधी प्रश्न मार्गी लावावेत,अशी मागणी रुग्ण व नागरिकांकडून करण्यात येत आहे. गरज असल्यास याला अधिक आक्रमक किंवा शोध पत्रकारितेच्या शैलीतही तयार करून देऊ शकतो.

# पत्रकारांच्या पाल्यांच्या शिक्षणासाठी व्हॉईस ऑफ मीडिया सर्वात पुढे

## व्हाईस ऑफ मीडिया व जयहिंद लोकचळवळीचा उपक्रम




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, अहिल्यानगर :** लोकशाही व्यवस्था भक्कम राहण्यासाठी पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असतो. समाजातील अन्याय, भ्रष्टाचार आणि जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडून त्यावर प्रभावीपणे प्रकाश टाकण्याचे काम पत्रकार सातत्याने करत असतात. त्यामुळे पत्रकारांनी स्वतः च्या कुटुंबासह समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्र येऊन कार्य करणे काळाची गरज आहे. जयहिंद लोकचळवळही निरोगी, सुदृढ, समताधिष्ठित आणि एकसंघ समाज निर्माण करण्यासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत आहे. समाजात कोणताही भेदभाव न ठेवता परस्पर सहकार्याची भावना जोपासली पाहिजे.

विषमता दूर होऊन प्रत्येक नागरिकाला अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत गरजा उपलब्ध झाल्या तरच राष्ट्र खऱ्या अर्थाने प्रगत होईल. सुदृढ नागरिक हाच प्रगत राष्ट्राचा खरा पाया आहे, असे प्रतिपादन नाशिक पदवीधर मतदारसंघाचे माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी केले.

व्हॉईस ऑफ मीडिया आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटना आणि जयहिंद लोकचळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर येथे पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षणिक किट वाटपाचा प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पत्रकारांच्या मुलांच्या शैक्षणिक प्रवासाला बळ देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले.

शिक्षण हीच भविष्यातील सर्वात मोठी गुंतवणूक असून पत्रकारांच्या पाल्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचेही यावेळी मान्यवरांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्हॉईस ऑफ मीडिया आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब गडाख यांनी केले. संघटनेचे संचालक गोरक्षनाथ मदने यांनी आपल्या मनोगतात पत्रकारांनी संघटित राहून समाजहिताच्या कार्यात अधिक सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहन केले. राज्य विंग प्रमुख अमोल मतकर यांनी संघटनेचा उद्देश, आतापर्यंतचे कार्य आणि भविष्यातील दिशा यांचा सविस्तर आढावा घेतला. संघटनेच्या पंचसूत्री कार्यक्रमांतर्गत आरोग्य, शिक्षण, कौशल्य विकास, शासकीय योजनांचा लाभ आणि संघटनात्मक बळकटीकरण या विषयांवर विशेष भर दिला जात असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच विविध क्षेत्रांसाठी स्वतंत्र विंगची स्थापना करून संघटनेचे कार्य अधिक प्रभावी करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी जिल्ह्यातील सर्व तालुकाध्यक्षांनी आपल्या- आपल्या तालुक्यातील संघटनात्मक कामकाजाचा आढावा सादर केला. पत्रकारांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, अडचणी आणि अपेक्षा यांवर मुक्तपणे चर्चा झाली. जिल्हाध्यक्ष बाळासाहेब गडाख यांनी सर्व पदाधिकाऱ्यांच्या समस्या समजून घेत त्यावर सकारात्मक भूमिका मांडत संघटना पत्रकारांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, अशी ग्वाही दिली.

आभार प्रदर्शन करताना जिल्हा सचिव नवनाथ वावरे यांनी आमदार सत्यजित तांबे आणि माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या माध्यमातून अहिल्यानगर, नाशिक, धुळे आणि नंदुरबार या चार जिल्ह्यांतील पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षणिक किट उपलब्ध करून देण्यात आल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पत्रकारांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि संघटनात्मक उपक्रमांना त्यांच्या माध्यमातून सातत्याने सहकार्य लाभत असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन व्हॉईस ऑफ मीडिया आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेचे संचालक गोरक्षनाथ मदने यांनी केले.

या प्रसंगी जिल्हाभरातील व्हॉईस ऑफ मीडिया आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेचे पदाधिकारी, तालुकाध्यक्ष, सदस्य आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिळ फाटा-कल्याण फाटा येथील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांची संयुक्त बैठक

## अपर पोलीस आयुक्त दुधे व वाहतूक अधिकारी अहिरे यांच्याशी चर्चा; लवकरच उपाययोजना होणार



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२३, शिळफाटा (ठाणे) :** शिळ फाटा आणि कल्याण फाटा सर्कल परिसरात दररोज होणाऱ्या भीषण वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना होणाऱ्या प्रचंड त्रासाच्या पार्श्वभूमीवर दक्ष नागरिक संघटना आणि भूमिपुत्र धर्माभिमानी संघटना यांनी पुढाकार घेतला आहे.

या संदर्भात ठाणे शहराचे अपर पोलीस आयुक्त अशोक दुधे आणि मुंब्रा वाहतूक अधिकारी अतुल अहिरे यांच्याशी संयुक्त बैठक घेऊन निवेदन देण्यात आले.

या चर्चेसाठी स्थानिक नगरसेविका वेदिका साहिल पाटील, भूमिपुत्र भूमिपुत्र धर्मभिमानी संघटनेचे तालुका प्रमुख बाबुराव मुंडे, साहिल पाटील, सुनिल आलिमकर, वैशाली भोसले, रवींद्र पाटील, प्रवीण पावशे, भगवान फौजदार, करण खारपाटील, गिरीश पाटील, ॲडवोकेट जितेश पाटील, शरद पाटील, रमेश राऊत, मंगल खारपाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत उपस्थित सर्वांनी शील फाटा-कल्याण फाटा परिसरातील वाहतूक कोंडीचे अचूक मुद्दे प्रशासनासमोर मांडले. नागरिकांना दररोज होणाऱ्या त्रासाची माहिती देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

चर्चेनंतर दोन्ही अधिकाऱ्यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेतली असून, लवकरच या ठिकाणी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना राबविल्या जातील आणि नागरिकांना यातून दिलासा मिळेल, असे आश्वासन दिले आहे.

दरम्यान, दक्ष नागरिक संघटनेने यापूर्वीही मुंब्रा येथील वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी पाठपुरावा करत ४० वाहतूक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्या करून घेतल्या होत्या.

# संततधार पावसामुळे नाशिकमध्ये दाणादाण; झाडे उन्मळून पडली, घरांमध्ये शिरले पाणी

## अग्निशमन दलाच्या जवानांचे नागरिकांच्या सुरक्षेसाठी 'शर्तीचे प्रयत्न'



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२४, नाशिक (नाशिक) :** गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे नाशिक शहरात ठीकठिकाणी मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी झाडे कोसळून वाहतूक कोंडी झाली, तर सखल भागात घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. या आणीबाणीच्या परिस्थितीत 'नाशिक अग्निशमन दलाच्या' जवानांनी देवदूतासारखे धावून जात कौतुकास्पद कामगिरी बजावली आहे.

**१.अशोका मार्ग :- गाडीवर मोठे झाड कोसळले;**

रात्रीच रस्ता केला मोकळाकाल रात्रीच्या सुमारास अशोका मार्गावरील मधुबन स्वीट्सजवळ एक भलेमोठे झाड थेट रस्त्याच्या मधोमध आणि उभ्या असलेल्या एका गाडीवर आडवे पडले. यामुळे या भागातील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन मुख्यालयातील जवानांनी रात्रीसाडेअकरा वाजतातातडीने घटनास्थळी धाव घेतली. जवानांनी कटरच्या साहाय्याने झाड बाजूला करून गाडी सुरक्षित काढली आणि रस्ता वाहतुकीसाठी पूर्ववत मोकळा करून दिला.

**घटनास्थळी तैनात जवान :** वाहनचालक जे. एस. सांत्रस, लीडिंग फायरमन एस. आर. थोरात, तसेच फायरमन आकाश गीते, आदित्य तासकर, वैभव कवरे आणि गौरव पाटील.

**२.भारत नगर :- घरांमध्ये शिरले पाणी;**

जवानांकडून मदतकार्य सुरूसतत पडणाऱ्या पावसामुळे भारत नगर परिसरातील अनेक घरांमध्ये पाणी घुसले आहे. त्यामुळे घरातील साहित्याचे मोठे नुकसान झाले असून नागरिकांचे हाल होत आहेत. घटनेचे गांभीर्य ओळखून मुख्यालयातील अग्निशमन दलाचे जवान तातडीने भारत नगर येथे दाखल झाले असून, पाणी बाहेर काढण्यासाठी व नागरिकांना मदत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करत आहेत. **घटनास्थळी तैनात जवान :** वाहनचालक एम.डी. कदम, लीडिंग फायरमन बी.एन. खोडे, तसेच फायरमन राहुल आहेर, मंगेश मतवाड आणि वैभव कवरे.

## थोडक्यात बातम्या

# रयत इंग्लिश मीडियम स्कूल, शिरवळ येथे दिंडी सोहळा संपन्न




**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२४, खंडाळा (सातारा) :** रयत इंग्लिश मिडीयम स्कुल शिरवळ शाळेत आषाढी एकादशीचे निमित्त पारंपरिक दिंडी पालखी सोहळा अत्यंत उत्सहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या दिंडी पालखी कार्यक्रमाची सुरुवात रयत इंग्लिश मिडीयम स्कुलच्या मुख्याध्यापिका वर्षा मांढरे, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी मेंबर आप्पासाहेब देशमुख, श्रीपतराव कदम महाविद्यालय शिरवळ या विद्यालयाचे उपप्राचार्य सुभाष आहेर, पर्यवेक्षिका वासंती घाडगे तसेच शिक्षक वृंद यांच्या हस्ते विधिवत पूजन करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि अभंगांच्या सुरेल वातावरणात दिंडी काढली.पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या विद्यार्थ्यांनी वारकरी संस्कृतीचे दर्शन घडवत परिसर भक्तिमय केला. शिस्तबद्ध रांग, उत्स्फूर्त सहभाग आणि सांस्कृतिक वातावरणामुळे संपूर्ण शाळा भक्तिरसात न्हाऊन निघाली. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका,पर्यवेक्षिका, सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या दिंडी सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वारकरी परंपरेबद्दल आदर,एकात्मता आणि सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करण्याची भावना अधिक दृढ झाली.

# प्रकाश आंबेडकर यांच्या पुकारण्यात आलेल्या महाराष्ट्र बंदला वसई विरार येथे ऊस्फुर्तपणे प्रतिसाद




**अक्षराज : सचिन खंदारे**

**दि.२४, वसई-विरार (पालघर) :** दिल्लीतील जंतर मंतर येथे शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यावर झालेल्या लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ दि.२३ जुलै २०२६ रोजी वंचित बहुजन आघाडी राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय ॲड प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांनी पुकारलेल्या बंदला वसई शहर पूर्व उत्कूर्त प्रतिसाद मिळाला.जंतर-मंतर वर विद्यार्थ्यांवर झालेल्या अमानुष लाटीचार्ज आणि नीट पेपर फुटी विरोधात वंचित बहुजन आघाडी वसई शहर (पूर्व) बंद करण्यात आले. आंदोलन दडपण्यासाठी प्रशासनाने वालीव पोलीस स्टेशन येथे काही प्रमुख कार्यकर्त्यांना आंदोलन सुरू होण्यापूर्वीच नजर कैदेत ठेवले होते. पोलिसांचा कडक पहारा आणि नजर कैदेत असूनही वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते रेंज ऑफिस नाका परिसरात जमा होऊन केंद्र सरकार आणि सत्ताधारी भाजपा विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा अशी मागणीही आंदोलकांनी केली

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे संजयजी पवार आनंदजी पाडमुख,अक्षय (भाऊ ) गुजर, सुनील पांडे, इंगळे साहेब, रंजीत सोनवणे अमोल घोंगडे, भरत गोरे कावेरी ताई घोंगडे, चंद्रभागाताई खिल्लारे, काजल ताई चिंचोळे आदीसह शेकडो कार्यकर्ते व विशेष म्हणजे महिला पदाधिकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

# महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी.यांची कोराडी प्रशिक्षण केंद्रास भेट




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२३, नागपूर :** महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी., संचालक (संचलन) अभय हरणे, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) धनाजी तोरस्कर, तसेच कार्यकारी संचालक (संवसु-२) राजेश पाटील यांनी कोराडी प्रशिक्षण केंद्राला सदिच्छा भेट देऊन प्रशिक्षणार्थींशी संवाद साधला. यावेळी इंडक्शन प्रशिक्षणातील अभियंते व कनिष्ठ रसायनशास्त्रज्ञे तसेच फॅमिलिअरायझेशन प्रशिक्षणातील नव्याने नियुक्त कनिष्ठ सुरक्षा अधिकाऱ्यांशी त्यांनी संवाद साधला.याप्रसंगी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. यांनी प्रशिक्षणार्थींना समर्पणभावनेने कार्य करण्याचे, सातत्याने ज्ञान व कौशल्य वृद्धिंगत करण्याचे, सकारात्मक दृष्टीकोन जोपासण्याचे आणि जबाबदारीने कर्तव्य बजावण्याचे आवाहन केले. चांगले संस्कार, शिस्त आणि प्रामाणिकपणाच्या बळावर चरज्ञश ींहश ऊेरिपू इर्शीीशॲ ींहरप धर्शीीशॲवरू हा दृष्टिकोन स्वीकारून अधिक कार्यक्षमता आणि विश्वासार्हता जपत महानिर्मितीच्या उज्वल भवितव्यासाठी योगदान द्यावे, तसेच आपल्या उत्कृष्ट कार्यातून महानिर्मितीची प्रतिष्ठा अधिक उंचावून गौरव मिळवावा, असे प्रेरणादायी मार्गदर्शन त्यांनी केले.याप्रसंगी अभय हरणे यांनी प्रशिक्षणार्थींना उत्कृष्ट कार्यप्रदर्शन, सातत्यपूर्ण कौशल्यवृद्धी आणि महानिर्मितीच्या प्रगतीत सक्रिय योगदान देण्याचे आवाहन केले. तसेच महानिर्मितीच्या भावी विस्तार आराखड्याची माहिती देताना सध्याची १४.५ ऋ्रथ स्थापित क्षमता २०३० पर्यंत २२ ऋ्रथ आणि २०३५ पर्यंत ३२ ऋ्रथ करण्याचे उद्दिष्ट असल्याचे सांगून या वाटचालीत योगदान देण्यासाठी स्वतःला सक्षम बनविण्याचे आवाहन केले.प्रशिक्षण केंद्राचे मुख्य अभियंता राजेश मोराळे यांनी मान्यवरांचे मनःपूर्वक आभार मानून त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे प्रशिक्षणार्थ्यांना उत्कृष्ट कार्यासाठी निश्चितच प्रेरणा मिळेल असा विश्वास व्यक्त केला. याप्रसंगी विवेक रोकडे, मुख्य अभियंता (खापरखेडा औ. वि. कें), विलास मोटघरे, मुख्य अभियंता (कोराडी प्रकल्प), राहुल नाळे, मुख्य अभियंता (तांत्रिक), मुकेश मेश्राम, उपऔ.सं.अ. तसेच कोराडी प्रशिक्षण केंद्र येथील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




# विठुमाऊलीच्या नामगजरासह स्वच्छता दिंडी सोहळ्यात

## स्वच्छता व पावसाळी पाण्याच्या संग्रहण संदेशाचा जागर

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२४, नवी मुंबई :** स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ अंतर्गत 'सफाई अपनाओ – बिमारी भगाओ' हे अभियान देशभरात राबविले जात असून अभियानांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने लोकसहभागातून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. असाच स्वच्छतेमधून आरोग्य जपणुकीचा संदेश प्रसारित करणारा 'स्वच्छता दिंडी' हा अभिनव उपक्रम करावे येथील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयाच्या सहयोगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने अत्यंत उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमात ६५० हून अधिक विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिक पारंपारिक वेशात सहभागी झाल्याने हा दिंडी सोहळा अत्यंत लक्षणीय झाला.

याप्रसंगी शुभेच्छा देताना नवी मुंबईच्या महापौर श्रीम. सुजाता पाटील यांनी ज्या शाळेत आपण शिकलो त्या शाळेच्या दिंडी उपक्रमात शाळेची माजी विद्यार्थिनी आणि नवी मुंबईची प्रथम नागरिक म्हणून सहभागी होता आले याचे वेगळेच समाधान असल्याचे सांगितले. आपल्या महाराष्ट्राला भक्तीची मोठी परंपरा असून वर्षोनुवर्षे निघणा-या आषाढी वारीतून एकात्मता आणि बंधुभावाचे दर्शन घडते. हीच भावना जपत आयोजित करण्यात आलेल्या स्वच्छता दिंडीतून स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण संरक्षण – संवर्धन, पावसाळी पाण्याचे संग्रहणाव्दारे नियोजन असे विविध संदेश प्रसारित होत असल्याबद्दल महापौरांनी आनंद व्यक्त केला. नवी मुंबई महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने करावेगाव येथी ज्ञानदीप शाळेच्या माध्यमातून 'स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६' मध्ये सुरू असलेल्या 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियानांतर्गत आयोजित स्वच्छता दिंडी उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी पालखी पूजन झाल्यानंतर महापौर श्रीम.सुजाता पाटील यांनी या अभिनव उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी आयुक्त डॉ.कैलास शिंदे, नगरसेविका संतोषी म्हात्रे, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे, बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त प्रशांत नेरकर, मुख्य स्वच्छता अधिकारी राजुसिंह चव्हाण आणि नरेश अंधेर तसेच ज्ञानदीप संस्थेचे अध्यक्ष रविंद्र नाईक, सचिव अरविंद नाईक, प्रसाद तांडेल, परशुराम पाटील, हरिश्चंद्र म्हात्रे, मुख्याध्यापक बंकट तांडेल, रत्नाकर तांडेल, सुरेश चव्हाण आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी शुभेच्छा देताना आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी उद्या आषाढी एकादशी असून सगळीकडून वारकरी पंढरपूरच्या दिशेने निघालेले असताना आपल्या लहान मुलांनाही वारीचे म



हत्व कळावे व दिंडी सोहळ्याच्या माध्यमातून त्यांना आपल्या परंपरेची, संस्कृतीची माहिती व्हावी तसेच स्वच्छतेचा व पर्यावरणाचा संदेश त्यांच्या मनात रूजावा यादृष्टीने ज्ञानदीप विद्यालयाच्या सहकार्याने स्वच्छता दिंडीचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगितले. पुढील वर्षी या परिसरातील विविध शाळांतून दिंड्या काढून विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेऊन त्या एकत्र येतील व दिंडी सोहळा साजरा करतील असे नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमा तसेच ज्ञानेश्वरी आणि तुकारामांची अभंग गाथा ठेवलेल्या पालखीचे महापौर सुजाता पाटील, आयुक्त डॉ.कैलास शिंदे, नगरसेविका संतोषी म्हात्रे आणि मान्यवरांच्या हस्ते पूजन करून ज्ञानदीप सेवा मंडळाच्या विद्यालयापासून सुरू झालेल्या या स्वच्छता दिंडी सोहळ्यात श्री विठ्ठल, श्रीरखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत मुक्ताबाई अशा संतांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी लक्षवेधी सहभाग घेतला. 'पंढरीनाथ महाराज की जय', 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' या नामगजरात लेझीम, टाळ – मृदुंग, शालेय बँडच्या गजरात शाळेपासून सीवूड येथील नेक्सस मॉलपर्यंत जाताना दिंडीतील विद्यार्थ्यांनी स्वच्छता संदेशाचे, प्लास्टिक प्रतिबंधाचे तसेच कॅच द रेन अभियानाचे फलक झळकावित, घोषणा देत स्वच्छता संदेशाचे प्रसारण केले. नेक्सस मॉलच्या पोडियमवर वारीच्या परंपरेनुसार रिंगण घालण्यात आले. यावेळी सहावीतील विद्यार्थिनी कु. वैष्णवी हाडे हिने 'मला प्लास्टिक नको गं बाई' हे भारूड ढंगदार शैलीत सादर केले. स्मित शिगवण, सोहम साळुंखे या विद्यार्थ्यांनीही स्वच्छता संदेश देणारे भारूड सादर केले. बँडच्या लयदार ठेक्यावर विद्यार्थिनींनी लेझीमची सुंदर प्रात्यक्षिके सादर केली.

स्वच्छता निरीक्षक विजय नाईक, अभियंता वैभव देशमुख आणि सहकारी यांनी नियोजनबध्द रितीने आयोजित केलेल्या या यशस्वीरित्या संपन्न झालेल्या स्वच्छता दिंडी सोहळ्याप्रमाणेच 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियानाच्या प्रत्येक उपक्रमांमध्ये लोकसहभागावर भर दिला जात असून या माध्यमातून स्वच्छतेविषयी व्यापक जनजागृती करण्यात येत आहे.

# नीट पेपरफुटी प्रकरणावरून चिमूर काँग्रेस आक्रमक

## खा.राहुल गांधी व खा.प्रियंका गांधी यांच्यावरील कारवाईच्या निषेधार्थ तहसील कार्यालयापुढे आंदोलन

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.२४, चिमूर (चंद्रपूर)** : शिक्षण व्यवस्थेतील कथित नीट (NEET) पेपरफुटी प्रकरण आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते खा.राहुल गांधी तसेच खा.प्रियंका गांधी यांच्यावरील कारवाईच्या निषेधार्थ चिमूर तालुका काँग्रेस कमिटीने गुरुवारी तहसील कार्यालयापुढे जोरदार आंदोलन करत प्रशासनाला निवेदन सादर केले. चिमूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ.विजय गावंडे पाटील यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात, नीट पेपरफुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीमाराचा निषेध नोंदवून, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावरील कारवाई लोकशाहीविरोधी असल्याचा आरोप करण्यात आला. केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात काँग्रेस कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत संताप व्यक्त केला. आंदोलनादरम्यान सरकारने विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणे थांबवावे. दोषींवर कठोर कारवाई करावी आणि लोकशाही मूल्यांचे संरक्षण करावे, अशी मागणी करण्यात आली.

निवेदनावर तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास धरणे आंदोलन, उपोषण आणि तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही काँग्रेसच्या वतीने प्रशासनाला देण्यात आला. काँग्रेसचे जेष्ठ नेते राम राऊत, चिमूर तालुका काँग्रेस अध्यक्ष विजय गावडे पाटील, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबिसी विभागाचे




उपाध्यक्ष धनराज मुगले, काँग्रेसचे जेष्ठ नेते संजय घुटके, काँग्रेसचे जेष्ठ नेते गजानन बुटके, काँग्रेस जेष्ठ नेते जुनेद खान, विजयकुमार घरत,चिमूर तालुका काँग्रेस अनु.सुचित जाती विभागाचे अध्यक्ष सप्निल मालके, काँग्रेस नेते शांताराम सेलवटकर, काँग्रेस जेष्ठ नेते राजू लोणारे, काँग्रेसचे जेष्ठ नेते धनराज वंजारी, अल्पसंख्याक अध्यक्ष बब्बू खान, चिमूर विधानसभा अध्यक्ष प्रशांत डवले, चिमूर तालुका युवक काँग्रेस अध्यक्ष नागेंद्र चट्टे, जिल्हा महासचिव रोहन नन्नावरे, संघटक अक्षय लांजेवार, श्किांत गेडाम,गणेश कारेकर, काँग्रेसचे जेष्ठ नेते योगेश दडमल, दुर्योधन तांबरभोगे, राजू चौखे, रत्नाकर विटाळे, अशोक कामडी, युवकचे जेष्ठ नेता रामदास चौधरी, काँग्रेसचे जेष्ठ नेते विलास पिसे, हितेश शेडाम, माणिकराव नगराळे, बशीर शेख, लोमेश शिरपूरकर, अरुण लाजेकर, समशेर पठाण, मनोज दिघोरे, दिगाबर लोथे, संजू पिसे, प्रकाश डुकरे, अरुण पिसे, पुरुषोत्तम इंदुरकर,रिता अंबादे यांच्यासह तालुका काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# महापुरुषांच्या पूर्णाकृती पुतळ्यांसाठी प्रस्तावित स्थळांची आ. जोरगेवार यांची पाहणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, चंद्रपूर :** शहरातील महापुरुषांच्या पूर्णाकृती पुतळ्यांच्या उभारणीसाठी प्रस्तावित स्थळांची पाहणी आ. किशोर जोरगेवार यांनी शुक्रवार, दि.२४ जुलै) जिल्हाधिकारी व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत केली. यावेळी प्रत्येक ठिकाणची उपलब्ध जागा,वाहतूक व्यवस्था,नागरिकांची सुरक्षितता व सोयी-सुविधा तसेच भविष्यातील विकासकामांच्या अनुषंगाने आवश्यक बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी वसुमना पंत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह,मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, तहसीलदार विजय पवार, वाहतूक पोलीस निरीक्षक प्रवीण कुमार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, भारतीय जनता पक्षाचे माजी महानगराध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, तुषार सोम, नगरसेवक जितेश कुळमेथे तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी व शिष्टमंडळाचे सदस्य उपस्थित होते.पाहणीची सुरुवात शासकीय विश्रामगृह परिसरातील राजमाता जिजाऊ माँसाहेब व धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यांसाठी प्रस्तावित स्थळाच्या पाहणीने करण्यात आली. या ठिकाणी जागेची उपलब्धता,वाहतुकीची सुलभता,परिसराचे नियोजन आणि सौंदर्यीकरणाच्या दृष्टीने आवश्यक बाबींचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर बंगाली कॅम्प चौक येथे नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी प्रस्तावित जागेची पाहणी करण्यात आली. तसेच गंजवॉर्ड



चौकातील राणी हिराई यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी प्रस्तावित स्थळाची ही पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांशी आवश्यक तांत्रिक बाबींवर चर्चा करण्यात आली. या कामांची प्रक्रिया नियोजनबद्ध, दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना आ. किशोर जोरगेवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.यावेळी बोलताना आ. किशोर जोरगेवार म्हणाले की,महापुरुषांचे कार्य,त्याग,विचार आणि प्रेरणा भावी पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचण्यासाठी त्यांच्या स्मारकांचे संवर्धन आणि पूर्णाकृती पुतळ्यांची उभारणी अत्यंत महत्त्वाची आहे. अशा स्मारकांमधून इतिहास जिवंत राहतो आणि नव्या पिढीला प्रेरणा मिळते. या सर्व विकासकामांमध्ये गुणवत्ता, सौंदर्यीकरण, सुरक्षितता आणि नागरिकांच्या सोयीसुविधांना सर्वोच्च प्राधान्य देण्यात यावे. तसेच प्रत्येक काम नियोजनबद्ध पद्धतीने आणि निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यात यावे,अशा सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# चंद्रपूर - हावडा थेट रेल्वे सेवेबाबत रेल्वे मंत्रालयाकडून सकारात्मक पावले; खा.धानोरकर यांच्या पाठपुराव्याला यश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, चंद्रपूर :** खासदार प्रतिभा धानोरकर यांनी बल्लारशाह येथून हावडा (कोलकाता) साठी थेट रेल्वे सेवा तात्काळ सुरु करण्याबाबत केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे पत्राद्वारे पत्र क्र. २२७५/२०२६, दि. ३० जून २०२६ आग्रही मागणी केली होती. या मागणीची तात्काळ दखल घेत रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्राद्वारे एमआर/ ए/ ४०८०/२०२६, दि. ७ जुलै २०२६ या विषयावर चौकशी व आवश्यक कार्यवाही सुरु असल्याचे लेखी आश्वासन दिले आहे. चंद्रपूर - बल्लारशाह ते हावडा अशी थेट रेल्वे सेवा सुरु करण्याची जुनी व रास्त मागणी आहे. सध्या थेट रेल्वे सेवा उपलब्ध नसल्याने या भागातील प्रवाशांना, व्यापाऱ्यांना व विद्यार्थ्यांना हावडा गाठण्यासाठी सुमारे १६० किमी दूर असलेल्या नागपूर किंवा गोंदिया स्थानकावर जावे लागते. यामुळे नागरिकांना मोठा आर्थिक, शारिरीक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. खा.प्रतिभा धानोरकर यांची बल्लारशाह-चांदा फोर्ट -मूल- वडसा मार्गाने हावडासाठी नवीन गाडी सुरु करण्यात यावी अथवा सध्या सुरु असलेल्या चेन्नई- बिलासपूर एक्सप्रेस गाडी क्र. १२८५२ चा विस्तार हावडापर्यंत करण्यात यावा, या मागण्या केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे मांडल्या होत्या. या पत्राची दखल घेत रेल्वे मंत्रालयाकडून सकारात्मक पावले उचलली असून, सदर विषयाची पडताळणी करुन आवश्यक ती कारवाई करण्यात येत असल्याचे केंद्रीय रेल्वेमंत्र्यांनी कळवले आहे.

# शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजनेची मुदत १२० दिवसांपर्यंत वाढवा - आ. मुनगंटीवार यांची मागणी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, चंद्रपूर :** अपघातानंतर कुटुंबाचा आधारवड हरपलेल्या शेतकरी कुटुंबांच्या वेदना, त्यांच्यावर ओढवणारे आर्थिक संकट आणि केवळ अर्जाच्या ३० दिवसांच्या मुदतीमुळे शासनाच्या मदतीपासून वंचित राहणाऱ्या असंख्य पात्र लाभार्थ्यांची व्यथा लक्षात घेऊन आ.सुधीर मुनगंटीवार यांनी अत्यंत संवेदनशीलतेने हा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यासमोर मांडला. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत अर्ज सादर करण्यासाठी असलेली सध्याची ३० दिवसांची मुदत किमान १२० दिवस करण्यात यावी, अशी शेतकरी हिताची त्यांनी आग्रही मागणी केली. ग्रामीण भागातील वास्तव परिस्थिती, आवश्यक कागदपत्रे मिळविण्यास होणारा विलंब आणि अपघातग्रस्त कुटुंबांच्या मानसिक, सामाजिक व आर्थिक संघर्षाचे वास्तव त्यांनी शासनासमोर प्रभावीपणे मांडले. या संवेदनशील मागणीची मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी तातडीने दखल घेत कृषी विभागाच्या प्रधान सचिवांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असून, या निर्णयामुळे राज्यातील हजारो शेतकरी कुटुंबांना मोठा दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी शासनाकडे सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अपघातानंतर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला असतो. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या मृत्यूमुळे किंवा कायमस्वरूपी अपंगत्वामुळे संपूर्ण कुटुंब मानसिक, सामाजिक आणि आर्थिक संकटात सापडते. अशा परिस्थितीत शासनाच्या विविध कार्यालयांतून पोलीस पंचनामा, शवविच्छेदन अहवाल, मृत्यू प्रमाणपत्र, सातबारा उतारा, वारस प्रमाणपत्र, बँक खात्याचा तपशील आदी आवश्यक कागदपत्रे गोळा करण्यासाठी अनेकदा दोन ते तीन महिने किंवा त्याहून अधिक कालावधी लागतो. त्यामुळे केवळ ३० दिवसांच्या मर्यादेत अर्ज सादर करणे अनेक पात्र लाभार्थ्यांना शक्य होत नाही. यामुळे पात्र असूनही अनेक शेतकरी कुटुंबांचे प्रस्ताव केवळ मुदत संपल्याच्या कारणावरून नामंजूर होतात आणि त्यांना अपील प्रक्रियेला सामोरे जावे लागते.या पार्श्वभूमीवर अर्ज सादर करण्याची मुदत ३० दिवसांवरून किमान १२० दिवस करण्यात यावी, यासोबतच संबंधित शासन निर्णयात आवश्यक सुधारणा करून सुधारित शासन निर्णय तातडीने निर्गमित करावा,अशी मागणी ही आ.मुनगंटीवार यांनी केली आहे.

# टेकवाडे आर.सी.पटेल शाळेत ग्रंथदिंडी



**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.२४, शिरपूर (धुळे) :** शिरपूर तालुक्यातील टेकवाडे येथील आर सी पटेल प्राथमिक शाळेत आषाढी एकादशी निमित्त ग्रंथ दिंडी काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांचे पोशाख परिधान केले होते.तालुक्यातील टेकवाडे येथील आर सी पटेल प्राथमिक शाळेत वृक्ष दिंडी काढण्यात आली. दिनांक २४ रोजी सकाळी शाळेपासून ग्रंथ दिंडी ला सुरुवात झाली. ग्रंथ दिंडी चे उद्घाटन शाळेत व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मोतीलाल पटेल व सामाजिक कार्यकर्ते विजय चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक किशोर सोनवणे उपस्थित मान्यवर.ग्रंथ दिंडीत विद्यार्थी विठ्ठल नामाचा गजर करीत सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांचा पोशाख परिधान केला होता. तर विद्यार्थिनी नववारी साडी व डोक्यावर तुळशी घेऊन सहभागी झाल्या होत्या. सदर ग्रंथ दिंडी गावातील झेंडा चौकात पोहचली. याठिकाणी गावातील महिला व पुरुषही विद्यार्थ्यांसोबत हरिनामाचा गजर करीत दिंडीत सहभागी झाले होते. शेवटी राममंदिरात ग्रंथदिंडीचे पूजन करून दिंडी शाळेत पोहचली.ग्रंथ दिंडीसाठी प्रशांत चौधरी, महेंद्र माळी, श्रीराम पाटील, अनिल माळी, भाईदास पावरा, श्वेता धनगर, रामचंद्र शिंदे यांनी मेहनत घेतली.

# पालम नगरपंचायतीची प्लास्टिकविरोधी धडक मोहीम ;

## एकल वापराच्या प्लास्टिकवर जप्तीची कारवाई




**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२३, पालम (परभणी) :** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार तसेच पालम नगरपंचायतीचे मुख्याधिकारी युवराज पौळ यांच्या मार्गदर्शनाखाली पालम शहरात एकल वापराच्या प्लास्टिकविरोधी विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत विविध व्यावसायिक आस्थापनांमधून बंदी असलेल्या प्लास्टिक साहित्याची जप्ती करण्यात आली.

या मोहिमेसाठी नगरपंचायतीकडून प्लास्टिक व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला. कार्यालयीन अधीक्षक बालाजी स्वामी, स्थापत्य अभियंता अमेय देशपांडे, स्वच्छता निरीक्षक शेख शफी, शहर समन्वयक गणेश यमगीर, मुकादम मोतीराम शिंदे, अनिल शिंदे, शिपाई राम टोंपे, तसेच रामा गायकवाड, विष्णू रोकडे, रघुनाथ रोकडे आणि रवी उफाडे यांनी प्लास्टिक जप्ती कारवाईत सहभाग घेतला.

मोहिमेदरम्यान शहरातील दुकाने, बेकरी, फळविक्रेते, रस्त्यावरील विक्रेते तसेच इतर व्यावसायिक आस्थापनांची तपासणी करण्यात आली. यावेळी एकदाच वापरून फेकून देण्यात येणाऱ्या प्लास्टिक वस्तू आढळून आल्याने त्या जप्त करण्यात आल्या. व्यापाऱ्यांना प्लास्टिक बंदीच्या नियमांची माहिती देऊन पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करण्याचे आवाहनही करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक वस्तूंवर बंदी लागू केली असून त्यामध्ये प्लास्टिकचे कप, ग्लास, प्लेट, वाट्या, चमचे, स्ट्रॉ, स्टिरर, प्लास्टिक पिशव्या, थर्मोकोलपासून बनविलेल्या वस्तू, प्लास्टिकचे झेंडे, हार, माळा तसेच काही प्रकारच्या प्लास्टिक पॅकेजिंगचा समावेश आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येते.

पहिल्यांदा नियमभंग केल्यास ५,००० रुपये , दुसऱ्यांदा १०,००० रुपये , तर तिसऱ्यांदा २५,००० रुपये दंडासह तीन महिन्यांपर्यंत कारावासाची तरतूद आहे. त्यामुळे व्यापारी व नागरिकांनी प्लास्टिकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशव्या, स्टील अथवा काचेची भांडी, पानाचे द्रोण, यांसारख्या पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करावा, असे आवाहन नगरपंचायतीने केले आहे.

पर्यावरण संवर्धन, स्वच्छ शहर आणि प्लास्टिकमुक्त पालम या उद्देशाने ही मोहीम पुढील काळातही नियमितपणे सुरू राहणार असल्याचे नगरपंचायत प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# डॉ.दासरवार यांचा भीषण अपघात, उपचारादरम्यान मृत्यू



**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२४, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील प्रतिष्ठित व्यापारी राजेश लक्ष्मण दासरवार यांचे सुपुत्र डॉ. प्रशांत दासरवार यांचे पुणे-चाकण परिसरात झालेल्या भीषण अपघातात दुर्दैवी निधन झाले. या अपघातात त्यांच्यासोबत असलेले डॉ. महेश व्यंकटराव आवळे हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. प्रशांत दासरवार यांनी पुण्यात इअचड शिक्षण पूर्ण करून वैद्यकीय व्यवसाय सुरू केला होता. नेहमीप्रमाणे प्रॅक्टिस आटोपल्यानंतर ते आणि डॉ.महेश आवळे दुचाकीवरून जेवणासाठी जात असताना भरधाव वेगातील एका वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. या भीषण अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले.

जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान डॉ.प्रशांत दासरवार यांची प्राणज्योत मालवली. मृत्यू समयी त्यांचे वय २५ वर्षे होते. डॉ. महेश आवळे यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. डॉ. प्रशांत दासरवार यांच्या निधनाची बातमी मुक्रमाबादेत समजताच संपूर्ण परिसरात शोककळा पसरली. सामाजिक, व्यापारी व वैद्यकीय क्षेत्रातून हळहळ व्यक्त केली जात आहे. डॉ.प्रशांत दासरवार हे मुक्रमाबाद येथील प्रतिष्ठित व्यापारी राजेश लक्ष्मण दासरवार यांचे एकुलते एक चिरंजीव होते. त्यांच्या पश्चात आई-वडील आणि दोन बहिणी असा परिवार आहे.